*Shram Sadhana Bombay Trust's*

# COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY
## BAMBHORI, POST BOX NO. 94, JALGAON – 425001. (M.S.)

**Brief Report**

**One day Workshop for Women on "Cooking & Entrepreneurship"**

| | | |
|---|---|---|
| Date and Venue / Location | : | 10/03/2023, SSBT's COET, Bambhori, Jalgaon. |
| Aim / Purpose | : | Extension Activity for Women Empowerment |
| Objectives | : | • Career Development<br>• Self-Reliance |
| Participant's Profile | : | 144 women participant attended the sessions |

Description about the Program :

- On 10.03.2023, one day Workshop on Cooking & Entrepreneurship was jointly organized by SSBT's College of Engineering & Technology and KBC North Maharashtra University, Jalgaon
- Grant Received from KBC, NMU : Rs.20,000/-
- Mr. Hemant Thombare guided on establishing the enterprises
- Master Chef Mrs. Shaila Chaudhari and Mrs. Puja Malu demonstrated various preparations
- Dr. Manisha Indani, Director -Department of External Education and Learning (DEEL) represented KBC NMU
- Dr. Sunita Patil coordinated the event under IQAC















एसएसबीटी महाविद्यालयात महिलांसाठी लघु उद्योगाविषयी मार्गदर्शन

एसएसबीटी अभियांत्रिकीत लघुउद्योगाविषयी मार्गदर्शन



# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ,जळगाव
## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
## ज्ञानविस्तार कार्यक्रम २०२२-२३

### कार्यक्रमाचा अहवाल

महाविद्यालय/संस्था/नाव/ :- श्रमसाधना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजि बांभोरी ,जळगाव.
उपक्रमाचे नाव/विषय:- एक दिवसीय कार्य शाळा:- पाककला व लघुउद्योग
उपक्रमाचा वार,दिनांक : १० मार्च २०२३ ,बुधवार
सहभागी महिला : १४४

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांनी दिलेल्या मान्यता पत्र क्र.ज्ञा.क्र कबचौ उमवि /१९/आ.अ.व .वि वि /कार्यशाळा /०७/२०२३ ई.पत्र नुसार एस. एस. बी. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजि ,बांभोरी ,जळगाव येथे ग्रामीण व शहरी महिलांसाठी "पाककला व लघुउद्योग" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेचे उद्घाटन प्रकल्प सल्लागार व उद्योजगता विकास प्रशिक्षक श्री हेमंत ठोंबरे, शिक्षणशास्त्र प्रशाळा प्रमुख क.ब.चौ.उमवि डॉ. मनीषा इंदानी, प्रसिध्द महाराष्ट्र मास्टर शेफ सौ. शैला चौधरी यांचा हस्ते करण्यात आले. या वेळी अभियांत्रिकी महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. जी. के.पटनाईक, डॉ.सुनीता पाटील व सौ. पूजा मालू उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ मनीषा इंदानी यांनी आजच्या काळात शिक्षणासोबत कलाकौशल्य विकसित करणे व त्याचे महत्व यावर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत सकाळच्या सत्रात महिलांना लघुउद्योगाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी श्री हेमंत ठोंबरे यांना आमंत्रित केले होते त्यात त्यांनी लघुउद्योजकात आवश्यक असणाऱ्या गुणांविषयीचे मार्गदर्शन केले जसे कि उद्योजक हा नम्र असावा,उद्योजकाला आपण केलेल्या उत्पादनाची विक्री करण्याचे कौशल्य अवगत असले पाहिजे.उद्योजकाचा लोकसंग्रह चांगला असावा आणि तो संभाषण कौशल्यात प्रवीण असावा.श्री हेमंत ठोंबरे सरांनी अशी बरीच लघुउद्योगाची उदाहरण सांगितली कि जे उद्योग महिला घरी राहून करू शकतात.नंतर त्यांनी उद्योग आधार,क्लस्टर योजना,व बँकेकडून मिळणाऱ्या कर्जविषयी माहिती दिली.शेवटी महिलांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली .

दुपारच्या सत्रासाठी प्रसिद्ध शेफ सौ शैला चौधरी यांना आमंत्रित करण्यात आले होते,त्यात त्यांनी विविध प्रकारची सरबते,जसे रोझ,जिरा,खस,अननस,ब्लू बेरी,पुदिना इ. आणि फालुदा,कुल्फी इ. सोप्या पद्धतीत व कमी वेळात बनविण्याचे प्रशिक्षण दिले.त्याच बरोबर त्यांनी सरबत कशा पद्धतीने टिकवावे ह्या विषयीचे मार्गदर्शन केले.त्यानंतर पूजा मालू यांनी प्रथम केकचा बेस कसा तयार करावा व केक सजावटीचे वेगवेगळे प्रकार व उपकरणांची माहिती दिली.नंतर त्यांनी रसमलाई केक चे प्रात्यक्षिक करून दाखविले तसेच केक चे विविध प्रकार चॉकलेट केक,स्ट्रॉबेरी केक, बॉम्ब केक,पायनॅपल केक,इ.करून दाखविले.व अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

Patil
डॉ. सुनिता एस पाटील
उपक्रम समन्वयक

बांभोरी जळगांव

25/03/2023
प्राचार्य
प्राचार्य
एस.एस.बी.टी.चे अभियांत्रिकी व
तांत्रिकी महाविद्यालय,बांभोरी,जळगांव